महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# दानाने सद्गती



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दूरध्वनी :

किंमत : दहा रुपये (१०/-)

# निवेदन

दानाने सद्गती होते, असे शास्त्रात वर्णन आहे. दानाने समाजातील गरीब - श्रीमंत ही विषमता कमी होते. दानाने पुण्यांची प्राप्ती होते. दानाने **'' सर्वजन हिताय सर्वजन सुखाय ''** कार्य होतात. म्हणून श्रीमंतानीच नव्हे तर गरिबांनी देखील यथा शक्ती दान केले पाहिजे.

दान केल्याने आपण गरीब न होता श्रीमंत होतो, असा अनेकांचा स्वानुभव आहे.

स्वामीजींच्या प्रवचनाने प्रेरित होऊन अनेक पुण्यात्मा **''दाता दरिद्रो न भवती ''** या वचनाची अनुभूती घेत आहे. म्हणून या वचनाची अनुभूती आपणास देखील घ्यावयाची असेल, तर दान कसे करावयास पाहिजे, दानाची महिमा, दानाची मर्यादा जाणून घेण्यासाठी '' दानाने सद्गती '' हे सत्संग - प्रवचनरुपी पुस्तक आपल्या हातात देत आहे.

प्रकाशक



**अतिथी आलिया द्यावे अन्नदान । अर्पी जीव प्राण परमार्थी ।।१।।**
**तोची एक नर श्रीहरी समान । करि दुजे कोण नाही ऐसा ।।२।।**
**दिनासी सन्मान करिता सादर । त्यांचे उपकारा पार नाही ।।३।।**
**नामा म्हणे ऐसे असावे भाविक । सर्वांभूती ऐक्य देखा पाहे ।।४।।**

◆ ◆ ◆

या अभंगाच्या अंतिम चरणामध्ये संत नामदेव महाराज म्हणतात...

**'' नामा म्हणे ऐसे असावे भाविक । ''**

भाविकाने म्हणजेच भक्तांने असे असायला पाहिजे. म्हणजेच भाविकाने भक्ताने काय करायला पाहिजे? भाविक भक्तांचे काय लक्षणे असायला पाहिजे? हे या अभंगामध्ये नामदेव महाराजांनी सांगितलेले आहे. ज्यांना भाविक भक्त व्हायचे असेल तर त्यांनी या अभंगामध्ये सांगितलेले भाविक भक्तांचे लक्षणे आत्मसात करून भक्त बनले पाहिजे.

भक्त बनायला पाहिजे हे ऐकल्या नंतर काहींच्या मनामध्ये संदेह निर्माण होऊ शकतो की, आम्ही भक्त का बनलो पाहिजे? भक्त बनल्याने काय लाभ आहे ? या प्रश्नांचे उत्तर संत एकनाथ महाराजांनी एका अभंगामध्ये दिलेले आहे. भक्त का बनले पाहिजे याचे समाधान त्यांच्या अभंगाचे मनन, चिंतन केल्याने होते. ते आपल्या अभंगामध्ये म्हणतात.....

**देवासी आवडे भक्त समागम । त्यांचे सर्व काम करि अंगे ।।**
**भक्त काजासाठी अवतार धरी । नांदे भक्ताघरी स्वये देव ।।**
**भक्ताविन देवा काहीच नावडे । भक्त तो आवडे सर्व काळ ।।**
**एका जनार्दनी भक्तांचा अंकित । देव सदोदित स्वये होय** ।।

भगवंताला भक्त अत्यंत आवडतो. भगवंताला भक्त अतिशय प्रिय आहे. म्हणून भगवंत भक्तांच्या सानिध्यात नेहमी राहण्याची इच्छा करतो. आणि म्हणून भगवंत भक्तांचे सर्व कार्य स्वतः करतो. भगवंत भक्तांचे कार्य करण्यासाठी नेहमी अवतार धारण करतो. संत एकनाथ महाराज स्वानुभवाने म्हणतात....

**'' नांदे भक्ता घरी स्वये देव ।। ''**

भगवंत भक्तांच्या घरी स्वतः नांदतो. नांदतो म्हणजे जसी कुलशिल कन्या आपल्या पतीच्या घरी नांदण्यासाठी जाते. म्हणजे राहण्यासाठी जाते. तर त्या ठिकाणी पतीची सेवा ती स्वतःकरते. पतीची सेवा तर ती करतेच, परंतु पतीचे जे संबंधी असेल म्हणजेच जसे- सासू-सासरे असेल तर त्यांचीदेखील ती यथामतीत्र यथाशक्ती सेवा करते. त्याचप्रमाणे भगवंत भक्तांच्या घरी नांदतो म्हणजेच भक्तांचे सर्व कार्य तर तो स्वतः करतोच. परंतु भक्तांच्या संबंधित जे असतील त्यांचे देखील भगवंत कार्य करतो. जसे सुदामाने भगवंताची भक्ती केली. भगवंताला देण्यासाठी आपणाजवळ काही ही नव्हते म्हणून दुसऱ्याकडून मूठीभर पोहे मागून आणले, ते भगवंताला दिले. तर त्याच्याबदल्यात न मागता भगवंताने काय दिले? तर संत बहेणाबाई म्हणते.....

**'' पोह्यासाठी गाव सोनियाचा ''**

भगवंताने सुदामाची झोपडी तर सुवर्ण महालामध्ये रुपांतरीत केलीच. परंतु सुदामाच्या गावातील लोकांना राहण्यासाठी सर्वांनाच जशी आपली सुवर्णाची द्वारकापूरी, तशी सुवर्णाची सुदामपुरी निर्माण केली.

अभंगाच्या तिसऱ्या व चौथ्या चरणामध्ये संत एकनाथ महाराज म्हणतात भक्ताच्या व्यतिरीक्त भगवंताला काहीच आवडत नाही. काहीच



प्रिय नाही. नेहमी म्हणजे पहिले भगवंताला भक्त आवडत होता, आज आवडतो व भविष्य काळात देखील भक्त आवडत राहील म्हणून भक्त बनले पाहिजे. एवढेच नव्हे तर संत एकनाथ महाराज आपल्या स्वानुभवाने म्हणतात की, भगवंत भक्तांच्या अधिन राहतात. आणि भक्तांच्या सर्व मनोकामना भगवंत पूर्ण करतात.

त्याच प्रमाणे संत तुकाराम महाराज देखील भक्त व भगवंताच्या संबंधात म्हणतात....

**भक्ता समागमे सर्वभावे हरी । सर्व काम करी न सांगता ।।**

भगवंत भक्तांच्या सानिध्यात राहतो आणि न सांगता भक्तांचे सर्व कार्य करतो. म्हणून या संसारामध्ये सुख आणि अंती मोक्ष प्राप्त करायचा असेल तर भक्त बनलेच पाहिजे.

अजून एक संत म्हणतात....

**जननी जने तो भक्त जन । या दाता या शूर ।**
**ना तो माता बाँझ रहे । व्यर्थ गुमा मत नूर ।।**

आपणास जर कुणाला जन्म द्यायचा असेल तर भक्ताला जन्म दिला पाहिजे किंवा दाता जो दान करणारा आहे त्याला जन्म दिला पाहिजे. या दोघांना जन्म नाही देवू शकलो तर शूर जो देशाच्या समाजाच्या माता-भगिनींच्या शील रक्षणासाठी आपल्या प्राणाची देखील आहुती देतो, त्याला जन्म दिला पाहिजे या तिघांना जन्म नाहीच देऊ शकलो तर निपुत्रिक राहिलेलं चांगलं.

या सर्व संताच्या अनुभवावरून आपणास कळालेच असेल की, भक्त बनणे किती अत्यावश्यक आहे. जो भक्त बनतो त्यांच्या सर्व इच्छा परमात्मा पूर्ण करतो व ज्याच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या असतील, कसल्याच प्रकारची इच्छा वासना शिल्लक नसेल त्याला या जगात सुख व मृत्यूनंतर तो मुक्त होतो. म्हणून या जगात सुख

व परलोकात सद्‌गती हवी असेल तर त्यासाठी भक्त बनले पाहिजे. भक्त बनायचे असेल तर त्यासाठी शेवटच्या चरणामध्ये जसे नामदेव महाराजांनी सांगितले की...

**नामा म्हणे ऐसे असावे भाविक ।**

भक्ताने असे असायला पाहिजे म्हणजे भाविक भक्ताने कसे असायला पाहिजे? त्यांचे लक्षणे काय? भक्त कुणाला म्हणतात? या सर्व प्रश्नाचे उत्तर देतांना नामदेव महाराज अभंगाच्या पहिल्या चरणामध्ये म्हणतात...

**अतिथी आलीया द्यावे अन्नदान । अर्पि जीव प्राण परमार्थी ।।**

भक्ताच्या अनेक लक्षणांपैकी पहिले लक्षण म्हणजे...

**अतिथी देवो भव!**

या भावनेने अन्नदान करायला पाहिजे व परमार्थासाठी परोपकारासाठी सर्वजन हिताय सर्वजन सुखाय कार्यासाठी तर आपला जीव, प्राण अर्पण करण्यास नेहमी तत्पर राहिले पाहिजे.

शास्त्रामध्ये अनेक प्रकारच्या दानाचे विधान व त्या दानाचे फळ देखील सांगितलेले आहे. जसे संत म्हणतात...

**भूदान - भूपाल**

जो साधू - संतासाठी, धर्मकार्यासाठी, मंदिरासाठी किंवा सर्वजण हिताय, सर्वजण सुखाय कार्यासाठी भूदान म्हणजेच जमीन दान करतो, तो पुढच्या जन्मात राजा किंवा राजदरबारी राहून सौख्य भोगतो.

**अन्नदान - आनंद**

अन्नदान केल्याने आनंद प्राप्त होतो.

**पाणीदाण - संतोष**

पाणी दान केल्याने मनामध्ये संतोष निर्माण होतो. अशा प्रकारे अनेक



दान व त्याचे फळे देखील सांगितलेले आहे. अनेक प्रकारचे दान जसे आत्ताच सांगितले - भूदान, अन्नदान, पाणीदान, गोदान, रक्तदान, तीलदान, प्राणदान, द्रव्यदान, ज्ञानदान हे सर्व दाने नाही करता आले तर कमीत कमी अन्नदान तरी केलेच पाहिजे. कारण भूदान करून भूपाल म्हणजे राजा नाही होता आले किंवा राजा होण्याची इच्छा नसेल तर भूदान नाही केले तरी चालू शकेल. परंतु प्रत्येक जीव - जंतूला अन्नाची आवश्यकता असते व प्रत्येकाजवळ थोडे बहुत अन्न असते. म्हणून प्रत्येक जण थोडे बहुत अन्नदान करू शकतो. म्हणून प्रत्येकाने अन्नदान करायलाच पाहिजे. म्हणून नामदेव महाराज म्हणतात की अन्नदान करा...

दान करा... दान करा... असे पुण्यात्मा साधू - संत भक्तच नव्हे तर सर्वच म्हणत असतात. ब्रह्मदेव देखील म्हणतात की,
दमणाने - देवतांचा, दयेने -दानवांचा व दानाने - मानवांचा उद्धार होतो. म्हणून प्रत्येक मानवाने काहीतरी दान नेहमी करत राहिले पाहिजे. दानाने गरीब - श्रीमंतामधील भेद कमी होत असतो. म्हणून आपण देखील दान करा. परंतु दान करण्यापूर्वी दानाचे जे प्रकार आहे ते देखील समजून घेतले पाहिजे.

**दानाचे प्रकारः-**

गितेमध्ये दानाचे सात्विक दान, राजस दान व तामस दान असे तीन प्रकार सांगितलेले आहे.

त्याच प्रमाणे भावार्थ रामायणामध्ये उत्तमदान, मध्यमदान, निद्यदान, अधमदान असे चार प्रकार सांगितले आहे.

**सात्त्विक दानः** सात्त्विक दान म्हणजे दान देणे हे आपले कर्तव्य आहे. अशा कर्तव्य भावनेने देश, काळ, पात्र प्राप्त झाल्यानंतर प्रतिपकाराची भावना मनात न ठेवता जे दान केल्या जाते, त्याला

सात्त्विक दान असे म्हणतात. असे जो दान करतो त्याला सात्त्विक दाता म्हणतात. असा सात्त्विक दाता शुभलोकाला जातो. सात्त्विक दान व सात्त्विक दाता सर्वांत श्रेष्ठ दान व दाता आहे म्हणून आपण सात्त्विक दाता झाले पाहिजे. सात्त्विक दान केले पाहिजे त्यासाठी आपण कर्तव्य भावनेने दान केले पाहिजे.

आई-वडिलांची, गुरुजनांची सेवा करणे, पत्नीचा सांभाळ करणे, मुलांना शिक्षण व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सुसंस्कार देणे, जसे आपले कर्तव्य आहे त्याच प्रमाणे दान देणे देखील आपले कर्तव्य आहे.

अशा कर्तव्य भावनेने चांगल्या देशात म्हणजेच भूमीत जसे मंदिरात, आश्रमात, तीर्थक्षेत्रात दान केले पाहिजे.

दान देतांना काळाचा देखील विचार केला पाहिजे. जसे पर्वकाळ, पुण्यकाळ, जप, तप, अनुष्ठान, सत्संग-प्रवचन, कथा कीर्तनाचा काळ पुण्यकारक समजला जातो. किंवा भूकंप आदि विपत्तीकाळामध्ये जे दान दिल्या जाते त्याला देखील योग्य काळ समजला जातो. थोडक्यात उन्हाळयात गरम कपडे दान देणे अयोग्य तर हिवाळयात गरम कपडे दान देणे योग्य काळ समजला जातो.

दान देतांना तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सत्प्रात्र दान करणे जीवनात नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, चुकून देखील कुपात्राला दान देता कामा नये. कारण कुपात्राला जे दान दिल्या जाते, असे दान दात्याला अधोगतीला, नरकाला नेते.

**राजस दानः** जे दान क्लेशपूर्वक, प्रतिपकाराच्या व फळाच्या इच्छेने दिल्या जाते त्या दानाला राजस दान असे म्हणतात.

राजस दान म्हणजे जे दान स्वेच्छेने दिल्या जात नाही त्यामुळे दान देतांना किंवा दिल्यानंतर दात्याला क्लेश, दुःख होतं. राजस दाता दान देतांना त्या दानाचे मला फळ मिळालं पाहिजे म्हणजे कमीतकमी



माझा सन्मान झाला पाहिजे. लोकांनी माझी स्तुती केली पाहिजे. म्हणजेच राजस दाता दान करतांना फळाच्या इच्छेने किंवा प्रतिपकाराच्या भावनेने दान करत असतो अशा दात्याला सद्‌गती मिळत नाही.

**तामस दान :** जे दान बिना सत्कारपूर्वक, तिरस्कार पूर्वक व अयोग्य देशात, कालात अपात्राला दिल्या जात त्याला तामस दान म्हणतात. **'' तम म्हणजे काय नरकची केवळ ''**

या संत वचनाप्रमाणे तामस दान दात्याला जीवंतपणी दुःख व मृत्यनंतर नरकाची प्राप्ती करून देत. म्हणून तामस दान चुकून देखील करू नये. जे दान सत्कारपूर्वक दिल्या जात नाही उलट तिरस्कार करून दिल्या जात. जो अयोग्य आहे, अयोग्य काळ आहे अशा अयोग्य देशात व अयोग्य काळात कुपात्राला जे दान दिल्या जात त्यामुळे दात्याला जीवंतपणी दुःख व मृत्यूनंतर नरकाची प्राप्ती होते म्हणून चुकून देखील तामस दान न करता जीवनात नेहमी सात्त्विक दान केले पाहिजे.

जो व्यसनी असेल, हत्या आदि क्रुर कर्म, अधर्म, पापकर्म करत असेल अशा तमोगुणी लोकांना दान - मदत करता कामा नये.

दानाचे अजून बरेच प्रकार आहेत जसे उत्तमदान, मध्यमदान, निंद्यदान, अधमदान इत्यादी.

**उत्तम व मध्यमदानः**

**आणुनी देईजे आपण । हे दानामाजी उत्तमदान ।**
**जे द्यावे घरा पाचारून । मध्यम दान त्या नाव ।।**

एखाद्या ठिकाणी सत्पात्र दानाची संधी उपलब्ध आहे असे कळताच जो दाता अशा ठिकाणी जावून दान करतो त्याला उत्तम दान म्हणतात व त्याला उत्तम दाता म्हणतात. उत्तम दानाच उत्तम

दात्याला सर्वात श्रेष्ठ फळ मिळत म्हणून जीवनात उत्तम दान केल पाहिजे.

सत्पात्र दानाची संधी उपलब्ध असतांना देखील जो दाता अशा ठिंकाणी न जाता दान घेणाऱ्या सत्पात्राला घरी बोलावून घेतो व घरी दान करतो त्याला मध्यम दान म्हणतात. उत्तम दानापेक्षा मध्यम दानाचे फळ कमी असते. जसे शंभर रुपये जाऊन दान करणे व शंभरच रुपये घरी बोलावून दान करणे याच्या फळात खूप मोठे अंतर आहे

**निंद्यदान :**

**वेळोवेळा याचक मागती । येवोनिया काकूळती ।**
**ऐसेनी देणे तयाप्रती । दान स्थिती ते निंद्य ।।**

याचक म्हणजेच दान घेणारा वेळोवेळी अत्यंत दिनवाणीने मागत असेल व वारंवार प्रार्थना करत असेल, विनंती करत असेल, याचना करत असेल तर, अशा प्रकारे वारंवार मागणी, प्रार्थना, विनंती, याचना केल्यानंतर जो याचकाला दान देतो त्याला निंद्य दान म्हणतात.

**अधमदानः**

**वसवसूनी देती अन्न । एक देती निर्भसून ।**
**ते अधमाहूनी अधम दान । पात्र निंदून जे देती ।।**

जो दाता याचकाला म्हणजेच दान मागणाऱ्याला शिव्या, शाप देऊन त्याची निर्भत्सना करून म्हणजेच अपमान करून, निंदा करून जे दान देतो त्या दानाला अधमदान म्हणतात. असे अधमदान कधी जीवनात करू नये. कारण अधमदाता अधमग़तीला नरकाला जातो.

**दान करण्याची पद्धत किंवा मर्यादा :**

सत्पात्री दान, उत्तम दान तर केलेच पाहिजे, परंतु दान देण्याची दान करण्याची जी मर्यादा संतांनी सांगितलेली आहे ती देखील नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. जसे ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...



**नाना कृषीवळू आपुले । पांघुरवी पेरिले ।**
**तैसे झाकी निपजले । दान पुण्य ।।**

कृषीवळू म्हणजेच शेतकरी चांगल्या भूमीमध्ये धान्य म्हणजेच बी पेरतो. पेरल्यानंतर ते सर्व झाकून टाकतो. पेरलेले धान्य शेतकरी उघडे पडू देत नाही दुसऱ्याला दिसू देत नाही. कारण जे धान्य अथवा बी उघड्यावर पडते ते उगवत नाही. त्याच्यापासून काही फळ मिळत नाही. ते बी किंवा धान्य निष्फळ होते.

त्याच प्रमाणे जे आपण जीवनामध्ये दान किंवा पुण्य केले असेल तर ते सर्व आपण झाकून टाकले पाहिजे. कारण दान पुण्य दुसऱ्याला सांगत राहिल्याने त्याचे फळ नष्ट होते. त्यामुळे दान पुण्य दुसऱ्याला दाखविण्यासाठी न करता आपल्या आत्मसंतुष्टीसाठी करावयास पाहिजे. ज्ञानी तर असे म्हणतात की उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला समजता कामा नये. या वचनाचा भावार्थ इतकाच आहे की, दान - पुण्य आपण गुप्त ठेवले पाहिजे. त्यासाठी गुप्तदान करण्याची मर्यादा साधू - संतानी, ऋषी - मुनिंनी लावून दिलेली आहे म्हणून जीवनामध्ये नेहमी गुप्तदान करत राहिले पाहिजे. म्हणजेच मी दान करतो असा अहंकार मनात आणू नये किंवा दुसऱ्याला दाखविण्यासाठी दान देण्याचा हेतू असू नये.

असा जो निष्काम भावनेने, कर्तव्य भावनेने, सत्पात्री दान करतो अशा दानाची शास्त्रात खूप मोठी महिमा आहे.

**दानाची महिमाः**

महाभारतामध्ये विधूर धृतराष्ट्राला दानाची महिमा सांगतांना म्हणतात...

**द्वाविमौ पुरुषो राजन स्वर्गस्थोपरि तिष्ठतः ।**
**प्रभुश्च क्षमया युक्तो दरिद्रश्च प्रदानवान ।।**

हे राजन दोन प्रकारचे मनुष्य स्वर्गाच्याही उंच पदाला जातात ते म्हणजे शक्तीशाली असूनदेखील क्षमा करतात आणि निर्धन असूनदेखील दान करतात.

पाची पांडव व द्रौपदी महान शक्तीशाली होते, तरी परंतु पांडवांनी अन्यायी, अत्याचारी कौरवावर अनेक वेळेस दया केली. त्याच प्रमाणे अश्वत्थाम्याने द्रौपदीचे झोपलेली पाच मुले मारले, तरी द्रौपदीने क्षमा केली.

जो निर्धन आहे तरी परंतु दान करतो तो स्वर्गलोकापेक्षाही जे उंचपद आहे अशा जनोलोक, तपोलोक किंवा ब्रह्मलोकाला जातो.

जशी महाभारतात मुद्गल ऋषीची कथा येते. मुद्गल ऋषी कुरुक्षेत्रामध्ये आपल्या कुंटुंबासह राहत होते. शिलउच्च वृत्तीने ते आपला उदरनिर्वाह करत होते. शिलउच्च वृत्तीने म्हणजे आपला नित्य क्रम आटोपल्यानंतर शेतकऱ्याच्या शेतात तेव्हा जायचे की ज्या वेळेस शेतकऱ्याने धान्य सोगूंन घेतले असेल व सरवा देखील वेचून घेतला असेल. अशा वेळेस शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पक्ष्याप्रमाणे धान्य वेचून आणायचे व पंधरा दिवसाला एकदा जेवण करायचे असा त्यांचा नियम होता.

असेच एक वेळेस भगवंताला नैवेद्य अर्पण करून ते जेवायला बसणार इतक्यात एक संत आले. भिक्षाम् देही माता! असा संताचा आवाज ऐकून आपल्या हिश्याचे सर्व अन्न ऋषीने त्या संताला दिल. ते संपल्यानंतर पत्नीने, मुलाने, सुनेने आपापल्या हिश्याच सर्व अन्न दिले. संत जेवण करून तृप्त होऊन निघून गेले. परत पंधरा दिवस गेले परत पहिल्यासारखाच प्रसंग घडला. सर्व अन्न एका संताला देऊन पाणी पिऊन आनंद व्यक्त केला की अतिथी घरासी आला आणि तृप्त होऊन गेला. परत पंधरा दिवस गेले म्हणजे आता ४५ दिवस झाले.



तरी परंतु अन्न नाही तरी संतुष्ट होते. हे सर्व ऐकल्यानंतर कदाचित काहींच्या मनात शंका निर्माण होऊ शकते की ४५ दिवस कोणी विना अन्नाचा राहू शकत का? तर याचे उत्तर हेच आहे की, भगवंतावर जर आपली पूर्ण निष्ठा असेल, श्रद्धा असेल, भावना असेल तर असे होऊ शकते. ज्यांची भगवंतावर श्रद्धा भावना असेल अशांना भगवंत निश्चीत शक्ती देतो. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात...

**ध्यानी योगीराज बैसले कपाटी । लागे पाठोपाठी तयांचीया ।।**
**तहान भूख त्यांचे राखी सीत उष्ण । झाले उदासिन देहभावा ।।**

ध्यानासाठी, भक्तिसाठी, धर्मासाठी, व्रतासाठी ज्यांचा दृढ निश्चय असेल तर त्यांना सहन करण्याची शक्ती परमात्मा निश्चीत देतो. जसे एखाद्या दरी कपाऱ्यामध्ये, गुफेमध्ये, योगी साधक - भक्त बसतात तर त्या ठिकाणी परमात्मा जातो. त्यांचा योगक्षेम चालवितो किंवा त्यांना शक्ती स्फूर्ती देतो, त्याचे तहान - भूख, सीत - उष्ण निवारण करतो किंवा सहनशक्ती देतो.

जसा या ठिकाणी देखील साधकांना अनुभव येतो. आपण बघता आहात की या ठिकाणी जसे मोठ्या संख्येने तरुण अनुष्ठानाला बसलेले आहे त्याच प्रमाणे वृद्धही आहे. आणि विशेष म्हणजे किती तरी लहान बालक अनुष्ठनाला बसलेले आहे. सकाळीच ब्रह्म मुहूर्तात हे बालक उठतात, दिवसभर जप करतात रात्री जवळपास अकरा वाजेपर्यंत प्रवचन चालते ते श्रवण करतात तरी ब्रह्ममुहूर्तात उठतात. सात दिवसांपासून मौन, अंतरबाह्य शुद्धता व फराळाचे व्रत पालन करत आहे. काही तर केवळ पाणी किंवा दूध घेऊनच अनुष्ठान करत आहे. तरी दुःखाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर नाही. ही भगवंताची कृपा नाही तर काय आहे? एवढ्या लहान वयात हे सर्व करणे ऐवढे सोपे नाही. आता कदाचित काहींच्या मनात विचार येईल याच्यात

काय विशेष आहे? तर बरेच लोक एकादशी व्रत करण्याचा निश्चय करतात. ज्या दिवसी एकादशी असते त्या दिवसापूर्वीच्या रात्री स्वयंपाक बनविणाऱ्यांना सूचना देतात की, उद्या एकादशी आहे हे सांगण्याचा त्यांचा उद्देश हा असतो की, आज असे काही चांगले पदार्थ बनविले पाहिजे की आज भरपूर जेवल्यामुळे उद्या भूख लागणार नाही. एकादशीच्या दिवसाचे अन्न जवळजवळ ते सर्व अगोदरच्या रात्रीच खातात व एकादशीच्या दिवसी काहींना काही दिवसभर फराळाचे उपासाच्या नावाने खातच राहतात. तरी संध्याकाळी त्याचा चेहरा पाहण्यासारखा होतो. एवढे खाऊन देखील ते म्हणतात की, खूप भूख लागली उपवास करावासा वाटत नाही. तेव्हा त्यांना काही जण म्हणतात " येता जाता चर पण एकादशी कर "

हे सांगण्याचा उद्देश हाच की भगवंताच्या कृपेने जसे हे श्रद्धावान बालके सात दिवस आनंदाने उपवास करत आहे ही भगवंताची कृपा आहे. त्याप्रमाणे मुद्गल ऋषीचे कुंटुंब ४५ दिवस उपवासी राहिले. ४५व्या दिवशी परत पहिल्यासारखाच प्रसंग घडला. अतिथीला सर्व अन्न संमर्पीत केले. तेव्हा तेथे भगवंत प्रगट झाले तेथे विमान आले व त्यात बसून ते भगवंताच्या धामाला चालल्या गेले. म्हणून आपण देखील सत्पात्री दान देऊन आपला उद्धार करून घेतला पाहिजे. आता काहींच्या मनात विचार येईल की, आम्ही जर दान केले तर मुद्गलऋषीसारखे आम्हाला देखील विमान नेण्यासाठी येईल का? मुद्गलऋषीसारखे आपण दान केले तर निश्चित येईल.परंतु बऱ्याच जणांचे दान कसे असते जसे संत कबीर महाराज म्हणतात...

**अहिरण की चोरी करे । करे सुई का दान ।**
**उपर चढकर देखा करे । कितीक दुरी विमान ।।**

लोहाराच्या ऐरणासारखी मोठी चोरी करायची किंवा अनितीने,



अन्यायाने धन कमवायचे व ते सर्व पापकर्म झाकण्यासाठी थोडेसे सुईसारखे त्याच्यातून दान करायचे आणि वरती चढून बघायचे की विमान आले की नाही.अजून किती दूर आहे. अशाने विमान येणार नाही. अशाने उंच गती मिळणार नाही. उंचगती मिळण्यासाठी, सद्गती होण्यासाठी उत्तमगती मिळण्यासाठी काय केले पाहिजे? तर संत तुकाराम महाराज सांगतात.....

**जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।**
**उत्तमची गती तो एक पावेल । उत्तम भोगिल जीव खानी ।।**

चांगल्या मार्गाने म्हणजे निती, न्याय, मर्यादा लक्षात घेऊन धन कमविले पाहिजे. उदास भावनेने म्हणजेच निःस्वार्थ भावनेने सत्पात्री दान आदी कार्यासाठी धनाचा जो वापर करतो तर तो उत्तम गतीला जातो. चांगल्या लोकामध्ये जाऊन सुख उपभोगतो. म्हणून सद्गतीला, भगवंताच्या धामाला जायचे असेल तर त्यासाठी स्वार्थ भावनेने मोठमोठे यज्ञ करण्यापेक्षा सत्पात्री दान केले पाहिजे. कारण

**बुभुक्षिताशी दिधल्या अन्न । सुखी होती दिन जन ।**
**तेणे सुखावे श्री भगवान । यज्ञादी पुण्य ते मशक ।।**

ज्यांना खरोखरच अन्नाची आवश्यकता आहे अशा दिनजनांना अन्न दिल्यानंतर भगवंत प्रसन्न होतात व ते फळ मिळते जे मोठमोठे यज्ञयागादी करून देखील मिळत नाही.

जशी कथा येते की, युधिष्ठीराने म्हणजेच धर्मराजाने खूप मोठा अश्वमेध यज्ञ केला. सर्वत्र त्यांच्या यज्ञाची चर्चा सुरू झाली की, धर्मराजासारखा महान यज्ञ आजपर्यंत कोणी केलाच नाही. धर्मराजाला देखील अभिमान झाला की, माझ्या यज्ञाची सर्व ठिकाणी प्रशंसा चालू आहे. माझ्यासारखा कोणी यज्ञ केला नाही. अशा वेळेस एक मुंगूस मात्र मनुष्य वाणीने म्हणायला लागल की,

"धर्मराजाच्या यज्ञाचं काही खर नाही यापेक्षा तर त्या संताचा, ऋषीचा यज्ञ चागंला होता. " हे ऐकून धर्मराज्याला मोठे आश्चर्य वाटले, की मी एवढा मोठा अश्वमेध यज्ञ केला आणि हा म्हणतो की, या यज्ञाच काही खरं नाही. ऋषीचा यज्ञ यापेक्षा चांगला होता. धर्मराजाने विचारले, कोणत्या ऋषीचा यज्ञ मोठा होता आणि का? तेव्हा मुंगुसाने उत्तर दिले की महाराज एका अरण्यामध्ये कित्येक प्रयत्नाने जमविलेल अन्न ऋषीने कित्येक दिवस उपवासी राहून मोठ्या आनंदाने अतिथीला दिले. त्यामुळे भगवंत प्रसन्न झाले, विमान घेऊन आले व विमानात बसवून ऋषी कुंटुंबाला घेऊन गेले. हे मी बघितले व त्यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या भूमित मी मोठ्या आनंदाने लोळलो. त्यांच्या चरणधुळीच्या स्पर्शाने मला आनंद तर झालाच. परंतु माझे केस सोन्याचे झाले. परंतु काही दिवसानंतर माझ्या लक्षात आले की, ज्या ठिकाणी धुळीचा स्पर्श झाला नाही, तेथील केस सोन्याचे न होता जसेच्या तसेच राहीले. तेव्हा मी ऐकले की धर्मराजाने मोठा यज्ञ मांडला आहे. अनेकांना अन्नदान चालू आहे. म्हणून मी माझे राहिलेले केस सोन्याचे करण्यासाठी पुष्कळ या ठिकाणी धुळीत लोळलो, परंतु माझा एकही केस सोन्याचा झाला नाही. म्हणून मला वाटले की, या यज्ञापेक्षा तो संताचा, ऋषीचा यज्ञ चांगला होता.

सांगण्याचा मतितार्थ हाच आहे की, श्रद्धेने, निःस्वार्थ भावनेने, जे दान दिल्या जाते त्याचा महिमा अगाध आहे. म्हणून आपली व आपल्या धनाची उत्तम गती व्हावी, असे वाटत असेल तर सत्पात्री निःस्वार्थ भावनेने दान केले पाहिजे. जेणे करून आपल्या धनाची उत्तम गती होईल.

**धनाची उत्तम गतीः**

भगवान शिव उमेला निमित्त करून सर्वांना सांगतात...



**सो धन धन्य प्रथम गती ज्याकी । धन्य पुण्य रती मती सोई पाकी ।**
**धन्य घडी सोई जब सतसंगा । धन्य जन्म द्विज भगती अभंगा ।।**

ते धन धन्य आहे की, ज्या धनाची प्रथम गती होते म्हणजेच उत्तम गती होते. कारण धनाच्या तीन गती मानलेल्या आहे, दान करणे धनाची उत्तम गती, भोग म्हणजेच स्वतःसाठी उपयोग करणे मध्यम गती व जे धन दान केल्या जात नाही स्वतःही उपयोगात आणल्या जात नाही अशा धनाची तिसरी अधम गती होते. ती म्हणजे नाश. म्हणून भगवान शिव म्हणतात की, आपल्या धनाची उत्तम गती झाली पाहिजे म्हणजेच दान केले पाहिजे. परंतु हे कोण करील तर जो पुण्यात्मा आहे व ज्याला संताची संगती आहे तसेच त्याची मती म्हणजेच बुद्धी परिपक्व असते. जी पुण्यामध्ये नेहमी रत असते व तिच घडी धन्य आहे. ज्यावेळेस आपणास संताची संगती घडते.

म्हणून संताच्या संगतीत राहून पुण्यकर्म व दान केले पाहिजे. ज्यामुळे दात्याची सद्‌गती होते. कारण जो दान करत नाही, जो कृपण म्हणजेच कंजूष आहे. त्याचे धन अनेक मार्गाने नष्ट होते. जसे...

**जो सुखी न करी कुटुंबालागी । जो निजात्मा निवविना नाना भोगी ।**
**जो द्रव्य न वेची धर्मालागी । त्यासी पंचविभागी उठती ।।**

गृहस्थाश्रमाचा धर्म आहे की, त्याने आपल्यावरती ज्यांच्या सेवेचा किंवा सांभाळ करण्याचा भार शास्त्राने टाकलेला आहे त्यांची सेवा व सांभाळ केलाच पाहिजे. जसी आई-वडिलांची सेवा, पत्नीचा सांभाळ केलाच पाहिजे, मुलांना चांगले शिक्षण व त्यापेक्षाही अत्यंत महत्त्वाचे म्हणजे चांगले सुसंस्कार दिलेच पाहिजे. त्याचप्रमाणे कुणी साधू - संत, अतिथी आले असतील तर त्यांची देखील यथाशक्ती सेवा केली पाहिजे. कारण...

**अतिथ घराशी आला सर्व पर्व येतील दारा ।**
**अतिथ विन्मुख गेला सर्व हानी झाली त्याला ।।**

म्हणून गृहस्थाश्रमाचे पहिले कर्तव्य आहे की, आपल्या कुटुंबाला सुखी केले पाहिजे. धन कमविण्यासाठी तन चांगले पाहिजे त्यासाठी अत्यावश्यक आपल्या स्वतःसाठी खर्च केला पाहिजे. त्याचप्रमाणे अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या उत्पन्नाचा कमीतकमी दहावा हिस्सा धर्मासाठी दान केलाच पाहिजे. अशी शास्त्र मर्यादा आहे.म्हणजेच धनाचे तीन उपयोग सांगितले, की आपल्या कुटुंबासाठी, स्वतःसाठी व धर्मासाठी धनाचा उपयोग केलाच पाहिजे. जर कोणी म्हणेल की धर्म आदि साठी उपयोग नाही केला तर? जर नाही केला तर त्यासाठी सांगतात '' त्यासी पंच विभागी उठती '' म्हणजे आपले धन पाच मार्गाने नाश पावेल. ते पाच मार्ग कोणते तर सांगतात...

**दायाद चोर राजा आगी । अधर्मे रोग संचरे अंगी ।**
**हे पाच जण विभागी । द्रव्य नाशालागी पावती ।।**

भाऊबंदाच्या भांडणामध्ये काही धन व्यर्थ चालल्या जाईल.. चोर चोरी करून काही धन नेईल. राजाचे सेवक काही धन नेतील. अग्नी, वादळ आदि निसर्गचक्रामुळे धन नाश पावेल. या सर्वातून वाचले तर एखादा असाध्य रोग होईल त्यामुळे धन नाश पावेल. म्हणून या पाच मार्गाने म्हणजेच दायाद (भाऊबंद) चोर, राजा (राजाचे सेवक,सरकारी नोकर) अग्नी (नैसर्गिक आपत्ती) रोग या मार्गाने धन नाश पावते म्हणून काहीतरी सत्पात्री दान केले पाहिजे. सत्पात्री दान नाही केले तर धनाची दुर्गती म्हणजेच अधम गती तर होतेच. परंतु जो कृपण म्हणजेच कजूंष दान न देणारा त्याची देखील दुर्गती होते जसे ज्ञानी महापुरुष म्हणतात...

**यदी कृपण को धन मिले उससे क्या उपकार ।**
**यदी कृपण दरिद्र हो कौण हानी संसार ।।**



कृपणाला कितीही धन मिळाले तरी तो जगावर काहीही उपकार करत नाही. त्यामुळे कृपण दरिद्री झाला तर संसाराची किंवा कुणाचीही हानी होत नाही. मात्र दाता जर दरिद्री झाला तर मात्र संसाराची हानी होते. परंतु परमात्मा असे होऊ देत नाही. म्हणजेच दात्याला परमात्मा दरिद्री होऊ देत नाही. कारण महापुरुषांचे वचन आहे की...

**'' दाता दरिद्रो न भवती ''**

दाता कधी दरिद्री होत नाही. हे वचन ऐकल्यानंतर कदाचित काहीच्या मते हे वचन उलटे वाटत असेल किंवा चुकीचे वाटत असेल. परंतु हे वचन सत्य आहे, असा महापुरुषांचा अनुभव आहे. दाता कधी दारिद्री होत नाही. जसे पांडवांचे राज्य कौरवांनी छळ कपटाने जिंकून घेतले. पांडव अरण्यात राहावयास लागले. दानशूर अरण्यात आणि कंजूष राज्यामध्ये अशी परिस्थिती झाली.त्या वेळेस सूर्यनारायणाने असे अक्षयपात्र पांडवांना दिले की, कितीही पदार्थ आणि कितीही प्रकारचे पदार्थ मागितले तरी त्या अक्षय पात्रातून मिळत होते. त्यामुळे पांडवाजवळ येऊन कुणीही भूकेने वापस जात नव्हते. भगवंताने त्यांना दरिद्रता येऊ दिली नाही. या उलट कृपण काही देत नाही आणि समजा त्याने काही दिलेच तर ज्यांना दिले ते दुःखी झाल्याशिवाय राहत नाही. जसे...

**यदि कृपन कुछ भूलवश कर बैठत है दान ।**
**निश्चय उसका भोक्ता भोगे कष्ट महान ।।**

कृपण एकतर दान करत नाही. आणि कदाचित त्याने चुकून देखील दान केले तर ज्याला दान केले, तो दुःख भोगल्याशिवाय रहात नाही. जसे कौरवांनी दुर्वासा आदि ऋषींना अन्नदान केले तर त्याचा परिणाम काय झाला तर दुर्वासालाही दुःख आणि दुर्वास

ज्यांच्या सानिध्यात गेले त्या पाडवांनाही दुःख झाले जसे संत म्हणतात...

**दुर्जनाचे अन्न सेवून दुर्वास । छळीले पांडवास निशिमाजी ।।**

शकुनीने सांगितल्या प्रमाणे दुर्योधनाने दुर्वास ऋषिला भोजन दिले. उद्देश हा की अन्न खाल्यानंतर त्यांची बुद्धी, आपल्या सारखीच दुष्ट होईल. सांगितल्या प्रमाणे दुर्वास ऋषी रात्री पांडवाकडे जातील अन्न मागतील व न दिल्यास शाप देऊन भस्म करतील. त्या प्रमाणे दुर्वास पांडवाकडे गेले. स्नान करून येईपर्यंत अन्न तयार ठेवा असे सांगितले. परंतु रात्री गेल्यामुळे द्रौपदीचे जेवण झाल्यामुळे दुसऱ्या दिवसापर्यंत सूर्यभगवंताने दिलेल्या पात्रापासून भोजन मिळणार नव्हते. त्यामुळे भगवंताचा धावा द्रौपदीने केला. भगवंत आले एक भाजीचे पान खाऊन तृप्त झाले. स्नान करतांना ऋषींना तृप्तीचे ढेकर आले. आता पांडवांनी जेवण वाढले, नाही खाता आले तर पांडव आपणास भस्म करतील म्हणून तेथूनच पलायन केले. सांगायचे तात्पर्य हे की दुर्जनाचे कृपणाचे अन्न खाल्यानंतर दुःख भोगावे लागते. तसे तर कृपण दान करत नाही.

**कृपन माया कारने बहुबिधी पाप कमाय ।**
**धर्म ध्यान सपने नही ना कछू देय न खाय ।।**
**कृपन रिक्त उठकर चला तजकर यह संसार ।**
**धर्म ध्यान सपने नही शिर पापो का भार ।।**

कृपण कंजूस माया मोहामुळे पाप ही पाप करतो दान,धर्म,सत्कर्म तो करत नाही. कमावलेला पैसा जमविलेले धन दुसऱ्याला देत नाही व स्वतःही खात नाही. कृपनाचे धन नाश पावते. व दान करून पुण्य न केल्यामुळे पाप ही पाप कृपणाजवळ असते व त्या पापामुळे त्याची अधोगती होते. म्हणून आपली अधोगती होऊ नये असे वाटत असेल तर अनेक प्रकारचे दान ज्या ठिकाणी सत्पात्र राहत असेल त्या



ठिकाणी जाऊन नाहीच करता आले तर कमीत कमी

**'' अतिथी आलीया द्यावे अन्न दान ''**

अतिथी आल्यानंतर अन्नदान जरूर करा व ''अर्पि जीव प्राण परमार्थी '' परमार्थासाठी परोपकारासाठी जीव प्राण जरी अर्पण करायची पाळी आली तर त्यासाठी तयार रहा. असा जो करतो त्याची किर्ती राहते व जोपर्यंत या जगामध्ये कुणाची सत्किर्ती राहत असेल तोपर्यंत असा जीव शुभ लोकांमध्ये राहतो. जशी शिबी राजाची किर्ती अजून आहे. कारण त्यांनी दुसऱ्यासाठी म्हणजेच केवळ एका कबुतरासाठी जीव प्राण अर्पण करण्याची तयारी दर्शविली.

जशी पुराणामध्ये कथा येते की...

उशिनगरवासी शिबीराजा आपल्या महालामध्ये बसला होता. इतक्यात एक कबुतर आले व ते राजाच्या खांद्यावर बसले. ते कबुतर राजाला म्हणालं की, हे राजन माझ्या पाठीमागे ससाणा लागलेला आहे. माझा प्राण वाचवा. राजाने त्याला अभयदान दिले. इतक्यात ससाणा आला व कबुतराला खायचे आहे, त्याला माझ्या स्वाधीन करा. ती माझी शिकार आहे, असे राजाला सांगू लागला. अभयदान दिलेले असल्यामुळे राजाने नकार दिला व कबुतराच्या बदल्यात आपले स्वतःचे मांस देण्याचे कबुल केले. एका पारड्यात कबुतर दुसऱ्या पारड्यात सर्व अंगावरचे मांस राज्याने स्वतः तोडून टाकले तरी कबुतराचे पारडे जडच त्या मुळे स्वतः राजा पारड्यात बसला. त्यावेळेस इंद्ररुपी ससाण्याने व अग्नीरुपी कबुतराने आपले रुप प्रगट केले. म्हणजेच इंद्र व अग्नी देवता जे परीक्षा पाहण्यासाठी आले होते, त्यानी आपले रुप प्रगट केले. राजाचे अंग सर्वांगसुदंर झाले. अशा प्रकारे परोपकारासाठी परमार्थासाठी जीव प्राण अर्पण करतो त्याची सद्गती होते. परंतु हे सर्व कोण करू शकतो तर

नामदेव महाराज अंभगाच्या दुसऱ्या चरणामध्ये म्हणतात...

**तोची एक नर श्रीहरीसमान । करी दुजे कोण नाही ऐसा ।।**

जो श्रीहरी समान पुण्यात्मा असतो तोच अशाप्रकारे दान करू शकतो किंवा जो दान करतो तो श्रीहरी समान होतो. एव्हढेच नव्हे तर तो श्रीहरी पेक्षाही श्रेष्ठ होतो.

जशी पुराणामध्ये कथा येते की, वामन भगवान बळीच्या यज्ञामध्ये गेले. बळीने वामन भगवंताला दान मागण्याचा अग्रह केला. वामन भगवंताने दान घेण्याचे नाकारले. खूपच आग्रह केल्यानंतर तीन पावले भूमी दान मागितली. भूमिदानाचा संकल्प करणार तेवंढ्यात बळीचे म्हणजेच असुरांचे गुरू शुक्राचार्य तेथे आले. व त्यांनी वामन भगवंताला भूमीदान करू नको, असा बळीला सल्ला दिला. कारण विचारल्यानंतर म्हणाले हे साक्षात विष्णू वामनाच्या रूपाने आलेले आहे. तीन पावलात तुझे सर्व राज्य घेतील म्हणून त्यांना भूदान करू नको. परंतु बळी म्हणाले की, मी जो मनाने निश्चय केला आहे तो निश्चय मी पूर्ण करीनच कारण जसे म्हणतात...

**रघुकूल रिती सदाचली आई । प्राण जाई परी वचन न जाई ।।**

प्राण गेला तरी काही हरकत नाही, परंतु मी माझे वचन व्यर्थ जाऊ देणार नाही. माझा शिष्य माझे ऐकत नाही. त्याने भूदान केले तर सर्व स्वर्गाचे राज्य विष्णू घेतील व देवतांना देतील. मग माझे काय? असा विचार करून संकल्प होऊ नये यासाठी ज्या वेळेस संकल्प करण्यासाठी झारीतून पाणी हातावर बळी घ्यावयास लागला. त्यावेळेस शुक्राचार्य किड्याचे रूप घेऊन झारीच्या छिद्राजवळ बसले. पाणी खाली का येत नाही म्हणून एक काडी घेतली व झारीच्या छिद्रावाटे आत टाकली. तर ती काडी शुक्राचार्यांच्या डोळयाला लागली. व त्यांचा डोळा फुटला. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात...



**आड आला म्हणोनी फोडीयेला डोळा ।बळीने शुक्र आंधळा केला ।।**

सत्कर्म, धर्मपालन, शुभकर्म करणाऱ्यांना आडवे जे येतात त्यांची हीच गती होते. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात...

**तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य । घातलीया भय नरका जाणे ।।**

सत् कार्याला साह्य केले पाहिजे.नाहीच साह्य करता आले तर कमीत कमी विरोध तरी करू नये. परंतु जे विरोध करतात त्यांची दुर्गती झाल्याशिवाय राहत नाही. असे म्हणतात शुक्राचार्यांचा डोळा फुटल्यानंतर त्यांना कावळयाची गती मिळाली. कूचित कावळा ज्याला म्हणतात तो हा शुक्राचार्य!

म्हणून स्वतः दान केले पाहिजे. व जो करत असेल त्यांना दान करण्यासाठी तर विरोध करता कामा नये. आणि जर आपणास कोणी विरोध करत असेल तरी स्वतः सत्कर्म, दानधर्म करायलाच पाहिजे. जसे डोळा फुटल्यानंतर शुक्राचार्य बाजूला झाला. पाणी खाली आले. तीन पावले भूदान करण्याचा संकल्प केला. पुढची कथा आपणास माहीत असेलच की दोन पावलातच विराट रूप धारण करून पाताळापासून स्वर्गलोकापर्यंतचे राज्य भगवंताने घेतले. तिसरा पाय आता कुठे ठेवायचा असे विचारल्यानंतर बळीची पत्नी समोर आली व म्हणाली की, तिसरा पाय आपल्या डोक्यावर घ्या. त्या प्रमाणे तिसरा पाय बळीच्या डोक्यावर ठेवल्यानंतर त्या पायाने दाब दिला. तर बळी सूतल लोकामध्ये गेला. तेथे गेल्यानंतर वामन भगवंताने परत लहान रूप धारण केले व बळीच्या समोर लिनतेने हात जोडून भगवंत उभे राहिले व म्हणाले की, हे बळी तू धन्य आहेस! की गुरूने सत्कार्यासाठी विरोध केला तरी तू त्यांचे वचन ऐकले नाही व भूदान केलेस मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे काय मागायचे असेल ते मागून घे. असे भगवंत बळीस म्हणाल्यानंतर

बळी म्हणाले की, प्रभू हे तर योग्य नाही. आत्ताच आपण माझ्याकडून तीन पावले भूमी दान मागून घेतली व मी जर आता आपल्याकडे काही मागितले तर तो व्यापार ठरेल. मला आपल्याकडे काहीही मागायचे नाही. उलट आपणच माझ्याकडून अजून काही मागायचे असेल तर मागून घ्या. असे म्हणाल्यानंतर भगवंत म्हणाले देशील? बळी म्हणाला हो देईल. हा माझा संकल्प आहे आणि परत जे मागाल ते देण्याचा संकल्प बळीने केला. तेव्हा भगवंताने काय मागितले? तर भगवंताने मांगितले हे बळी संत सेवेने व दानाने तुझी शक्ती बलवान झालेली आहे. स्वर्गाचे राज्य म्हणजेच इंद्र पद मी तुला देणार आहे. परंतु आताच्या इंद्राचा काल जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत तू या सूतल लोकांमध्ये रहा व जोपर्यंत तू येथे राहशील तोपर्यंत तुझ्याद्वाराचे द्वारपाल होण्याचे भाग्य तू मला दे. अशा प्रकारे जे मागेल ते देईल असे वचन दिलेले असल्यामुळे बळीचे भगवंत द्वारपाल झाले. बळीच्या राज्याचे रक्षण करावयास लागले एवढा महिमा कशाने प्राप्त झाला तर दानाने.

बळीच्या संदर्भात अजून एक कथा अशी सांगतात की, बळी पूर्व जन्मामध्ये एक जुगारी, दारूड्या व वेश्यागामी पापी व्यक्ती होता. एक वेळेस त्याला जुगारामध्ये खूप मोठे धन मिळाले. ते धन तो वेश्येला प्रसन्न करण्यासाठी घेऊन निघाला. रस्याने जात असतांना एका जिर्ण मंदिरा समोर तो ठोकर लागून खाली पडला. खाली पडल्यानंतर त्याला कळाले, माझा आता मृत्यू निश्चीत होणार म्हणून जे धन वेश्येला देण्यासाठी त्याने सोबत आणले होते ते मृत्यू निश्चीत होणार म्हणून हे धन सत्कारणी लागले पाहिजे, असा विचार त्याच्या काही पूर्व पुण्यामुळे त्याला सुचला. त्याने त्या भग्न अवस्थेत असलेल्या मंदिरातील संताला बोलाविले. त्यांना त्या मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी



व दानासाठी ते धन दिले. संताने देखील त्या धनाचा सद्‌उपयोग केला. त्यामुळे एवढे बळ आले की, त्यामुळे तो व्यसनी, जुगारी, वेश्यागामी व्यक्ती पुढच्या जन्मामंध्ये असूर कुळामध्ये बळी झाला. त्याने स्वर्गावर स्वारी करून इंद्रपद जिंकून घेतले. ते इंद्रपद परत देवतांना देण्यासाठी भगवंताला वामन अवतार धारण करून युद्ध न करता याचक म्हणून बळीच्या द्वारात जाऊन दान मागून वापस घ्यावे लागले. कारण भगवंत जाणत होते की, दानामुळे, गुरु, संतसेवेमुळे बळी बलवान झालेला आहे. त्याच्याशी युद्ध क़रणे सोपे नाही. ऐवढे जे सामर्थ्य बळीला प्राप्त झाले तर कशामुळे केवळ दानामुळे म्हणून सत्पात्री दान केले पाहिजे. पंरतु दान करतांना मनात अहंकार आनू नये की मी श्रीमंत आहे व दान घेणारा बिचारा गरीब आहे असे बिचारा समजून दान करू नये.

अतिथी देवो भव! दरिद्री नारायण! गरीब असला तरी तो नारायण स्वरूप आहे या भावनेने दान केले पाहिजे. त्यासाठी नामदेव महाराज अभंगाच्या तिसऱ्या चरणामध्ये म्हणतात,....

**दिनाशी सन्मान करीता सादर । त्याचे उपकारा पार नाही ।।**

जो दीन असेल म्हणजेच गरीब असेल तर त्याला दरिद्री नारायण ! म्हणजेच तो बिचारा गरीब आहे असे न समजता तो नारायण आहे. भगवंत स्वरूप आहे. वामन भगवंताप्रमाणे मला धन्य करण्यासाठी आलेला आहे. अशी भावना ठेवून जेवढे दान करता येईल तेवढे दान केले पाहिजे. त्या उपकाराला पार राहणार नाही. म्हणजेच अपार उपकार आपले होतील. परंतु मी उपकार केलेला आहे अशी चुकून देखील आपल्या मनात भावना येता कामा नये. गुरू नानकदेव देखील म्हणतात...

**दान करो गरीबी से बाबा मगरुरीमे धोका है ।**

दान करताना मनात तनात लीनता पाहिजे मगरूरी म्हणजे अभिमान चांगला नाही. मी श्रीमंत आहे, दाता आहे मोठा दानी आहे, असा विचार आपल्या मनात येऊ देता कामा नये. मी दान करतो म्हणजे दान घेण्याऱ्यावर उपकार करतो असा भाव मनात आणू नये. मी ज्याला दान केले त्याच्यावर मी उपकार केला असा मनात भाव न आणता ज्याने दान स्वीकारले त्याने दान स्वीकारून माझ्यावर उपकार केला असा शुद्ध भाव मनात आणला पाहिजे. कारण आपण ज्याला दान देतो त्याच्यावर आपण उपकार करतो असे नव्हे, तर जो दान स्वीकारतो तो दान स्वीकारून आपणावर उपकार करत असतो. जसे भूमिला आपण बी, खत पाणी देतो म्हणजे भूमिवर आपण उपकार करतो असे नव्हे तर भूमिचे म्हणजेच जमिनीचे आपल्यावर उपकार आहे. जमीन, बी, पाणी, खत घेते व कितीतरी पटीने आपणास देते. म्हणून मनात अभिमान न धरता आपण दान केले पाहिजे. असे ऐकल्यानंतर देखील कुणी म्हणतील की आम्ही आमचे यांना देतो त्यांचे पालन पोषण करतो, अशा वेळेस लक्षात ठेवले पाहिजे की, अशी भावना मनात आणने देखील चुकीचे आहे. कारण गुरु नानकदेव म्हणतात....

**हमको इनको सब दुनियाको । पालनेवाला भगवान है ।**
**तू कहता है मै दाता हूँ ।माल कहासे आता है ।।**

आमचा पालन करणारा भगवंत आहे . संत देखील म्हणतात...

**आम्ही काय कुणाचे खातो । आमचा देव आम्हा देतो ।।**

आमचा परमात्मा आमचे पालन करतो. योगक्षेम चालवितो. भगवंत देखील म्हणतात...

**योगक्षेम वहाम्यहम्**

मी भक्तांचा संताचा योगक्षेम चालवतो म्हणजे जे अप्राप्त आहे ते प्राप्त करून देतो व जे प्राप्त आहे त्याचे रक्षण करतो. म्हणजेच आमचं रक्षण



सांभाळ परमात्मा करतो. इतरांचा देखील परमात्मा सांभाळ करतो. जसे संत तुकाराम महाराज देखील म्हणतात......

**पक्षीयाच्या घरी नाही सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ।।**

पक्षीयांच्या घरी म्हणजे घरट्यात साठविण्याची काही व्यवस्था नसते तरी त्यांचा सांभाळ परमात्मा करतो. परत संत म्हणतात...

**सकळ जीवांचा करीतो सांभाळ ।तुज मोकलील ऐसे नाही ।।**

आपण एखाद्याला दान दिले नाही म्हणजे तो मरेल असे नाही. कारण परमात्मा सकळ जीवांचा म्हणजे सर्वांचा सांभाळ करतो. अजून संत म्हणतात...

**पाहू जाता एक देव । त्याने निर्मीयेले सर्व ।**
**अन्नपाणी तोची देतो । प्रेमे सर्व सांभाळीतो ।।**

सर्वांचा एकच परमात्मा आहे. त्यानेच सर्व निर्माण केलेले आहे. त्यामुळे सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहे. त्यामुळे परमात्मा सर्वांचा सांभाळ करतो. त्यामुळे मी सांभाळतो, मी दान देतो म्हणून हे सर्व चालते असा अहंकार मनात आणने चुकीचे आहे.

हे सर्व ऐकून देखील कुणी म्हणत असेल की,

**तू कहेता है । मै दाता हूँ**

मी दाता आहे. मी दान करतो, असे मानणाऱ्यांना नानकदेव विचारतात की, तू दान करण्यासाठी माल, धन, द्रव्य, अन्न पाणी कोठून आणतो? कारण आपले तर या जगात काहीच नाही. सर्व त्या परमेश्वराचे आहे. पृथ्वी, पाणी, हवा, सूर्यप्रकाश ज्यामुळे आपणास धान्य आदी मिळते. हे सर्व त्या परमेश्वराचे आहे. आपले या जगात आहे तरी काय? जसे संत तुकाराम महाराज म्हणतात....

**देह हे देवाचे धन कुबेराचे । ऐथे मनुष्याचे काय आहे ।।**

इतर तर काय पण स्वतःचे शरीर देखिल आपले नाही. ते

देखील देवाचे आहे. धन कुबेराचे आहे. आपले या जगात काहीही नाही. म्हणून त्या परमेश्वराचे देह, धन, अन्न पाणी आदी आहे म्हणून त्याच परमेश्वराच्या निमित्त ते दिले पाहिजे. परमेश्वराचे परमेश्वराला देतांना अहंकार कसला? म्हणून अहंकार न धरता संत रहीम सारखे दान केले पाहिजे. जसे संत म्हणतात.. की रहीम खूप मोठे दानी होते. ते नेहमी दान करायचे, परंतु दान करतांना लज्जेने जशी मान खाली वाकवतात तसे ते दान करतांना खाली बघायचे. म्हणून त्यांना विचारण्यात आले आपण एवढे मोठे दानी आहात. आपल्यासारखा दानी शोधून सापडणे दुर्मिळ आहे. असे असतांना आपण  दान करतांना लज्जा का धरतात? त्यांनी सांगितले...

**देनहार कोई ओर है भेजत है दिन रैन ।**
**लोक धरम हम पर करे त्यो त्यो निचे नैन ।।**

देनहार कोई ओर है दान देणारा मी नाही, तो दुसरा आहे. तो दुसरा आहे म्हणजे तो साक्षात परमात्मा आहे. जो रात्रंदिवस पाठवत राहतो. तो दाता आहे. परंतु लोक असे मानतात की रहीम दान करतो. मी काहीच दान करत नाही देणारा परमात्मा आहे परंतु मी देणारा आहे असे लोक मानतात. हे ऐकून मला लज्जा वाटते कारण मी काहीच देत नाही, देता देवविता, नेता नेवविता परमात्मा आहे.

म्हणून जसे खरे संत भक्त लीन भावनेने दान करतात. तसे आपण नेहमी दान केले पाहिजे. दान केले पाहिजे. दान केले पाहिजे. असा शब्द प्रयोग अनेक वेळेस आल्यानंतर कदाचित काहींच्या मनात अशी शंका येऊ शकते की, जे संत म्हणत आहे की दान करा त्यानांच दान घेण्याची इच्छा तर नाही? म्हणून दान करण्याचा वारंवार उपदेश करत आहे. परंतु साधू संतांना आपल्या दानाची काहीही आवश्यकता नसते. असे ऐकल्यानंतर काही म्हणतील की जर साधू संतांना दानाची



आवश्यकता नसते तर संत दान करण्याचा उपदेश का करतात किंवा काही संत गावोगावी दान मागत का फिरतात? तर याचे उत्तर देखील गुरू नानकदेवांनी दिलेले आहे. ते म्हणतात...

**चारो दिशा की जागिर हमको । तोटा नही कछू खानेको ।**
**आपको हुशियार करना इसलीए ।घर घर फिरते भिक्षाको ।।**

आम्हाला खान्याचा तोटा नाही. कारण ..

**ब्रम्हांडाचा धनी संतांनी केला ऋणी ।**

जो ब्रम्हांडाचा धनी परमात्मा आहे तो भक्तीमुळे संतांचा ऋणी आहे. तो संतांचा योगक्षेम चालवितो त्यांना काहीही कमतरता नाही.तरी देखील संत गावोगाव, घरोघर फिरतात कशासाठी? तर आपणास उपदेश करण्यासाठी की आपणास जर सद्गती प्राप्त करायची असेल तर त्यासाठी दान करा. हे सांगण्यासाठी संत गावोगाव, घरोघर फिरत असतात. आपल्या स्वतः साठी नाही तर समाजाच्या हितासाठी ते फिरतात.

जसे समर्थ रामदास स्वामी नेहमी भिक्षा मागायचे. एक दिवस ते छत्रपती शिवाजी महाराजांकडे भिक्षा मागण्यासाठी गेले. " जय जय रघूविर समर्थ! " हा आवाज छत्रपती शिवाजी महाराजांनी ऐकला. आपले गुरू भिक्षा मागण्यासाठी आले हे त्यांनी ओळखले त्यांना काय द्यावे. याचा विचार ते करायला लागले. कारण

**यह तन बिष की बेलरी । गुरु अमृत की खान ।**
**शिस दिये ज्यो गुरु मिले । तो भि सस्ता जान ।।**

एक वेळेस तर काय अनेक वेळेस शिर कमल गुरूच्या चरणावर कापून अर्पण केले आणि त्या बदल्यात गुरु भेटले तर समजायचे की खूप स्वस्तात मिळाले. आणि समर्थ रामदास स्वामी तर केवळ गुरुच नाही तर सद्गुरु आहे. त्यांना काय द्यावे याचा विचार छत्रपती शिव

शिवाजी महाराज करावयास लागले. व त्याच क्षणी त्यांना विचार सुचला आणि त्याप्रमाणे त्यांनी तन, मन, धन, राज्यच काय तर सर्वस्व अर्पण करण्याचा निर्णय घेतला. व त्याप्रमाणे त्यांनी लिहून तो कागद त्यांच्या झोळीमध्ये टाकला. समर्थांनी जाणल्यानंतर समर्थ म्हणाले शिवबा हे सर्व मला अर्पण केले, आता आपण काय कराल ? शिवाजी महाराज म्हणाले गुरूदेव जसा आपण आदेश द्याल ते मी करेल. समर्थांनी त्यांना झोळी दिली व भिक्षा मागून आणण्यास सांगितली. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी भिक्षा मागून आणली. गुरुला समर्पित केली. समर्थांनी जेवण केले, छत्रपती शिवाजी महाराजांना प्रसाद दिला व त्यानंतर परत विचारले. आता राज्य आपण मला अर्पण केलेस तर आपण काय कराल ? पहिल्या प्रमाणेच उत्तर दिले की, जो आपण आदेश द्याल त्याचे पालन करील.

समर्थ रामदास स्वामीनी विचारले हे राज्य आता कुणाचे आहे? राजांनी उत्तर दिले गुरुदेव हे राज्य आता आपले आहे. हे ऐकल्यानंतर समर्थ म्हणाले ठीक आहे. हे राज्य आता माझे आहे म्हणजेच संताचे आहे, भगवंताचे आहे. तर आपण हे राज्य आता संताचे, भगवंताचे म्हणून सांभाळा आणि त्याप्रमाणे शिवाजी महराजांनी ते मान्य केले. सांगायचे तात्पर्य हेच आहे, की एवढे राज्य मिळाले तरी परंतु समर्थ रामदास स्वामी त्या राज्याचे मालक न बनता घरोघरी भिक्षाच मागत राहीले असे का? त्यांचा उद्देश काय तर जसे गुरु नानकदेवांनी सांगितले की...

**'' आपको हुशीयार करना इसलिए । घर घर फिरते भिक्षाको ''**

स्वतःसाठी नाही तर आपणासाठी समाजाच्या उद्धारासाठी संत हे सर्व करत असतात. आणि हे सर्व करत असले तरी अशा सत्कार्यात बऱ्याच वेळेस चांगले वाईट अनुभव येत असतात.



जसे रामदास स्वामींना देखील आले .रामदास स्वामी भिक्षा मागण्यासाठी जायचे तेव्हा एक बाई अशी होती, की ती नेहमीच शिव्या द्यायची हे बघून दुसरी सुशीलबाई भक्त नेहमी म्हणायची की महाराज आपण माझ्याकडून जितकी पाहिजे तितकी भिक्षा घेऊन जा. परंतु त्या बाईकडे जाऊ नका. समर्थांनी विचारले कारण? तर ती सुशीलबाई म्हणाली की, ती बाई चांगली नाही, ती नेहमीच आपल्याला शिव्या देते. तेव्हा समर्थ म्हणाले शिव्या का होईना परंतु देते. शिव्या न देता ती कधी वापस पाठवत नाही. आज शिव्या देते भविष्य काळात कदाचित दुसरे काही देईल म्हणून समर्थांनी त्या बाईच्या घरी जाण्याचे सोडले नाही आणि एक दिवस खरोखरच तसे झाले. ती बाई चुलीला पोचारा करत होती. तितक्यात तिने जय जय रघूविर समर्थ ! हा आवाज ऐकला आणि जणू तिच्या पायाची आग मस्तकात पोहचली पोचारा करतांना ती तशीच उठली व तिने तो पोचारा समर्थांच्या झोळीत टाकला व म्हणाली भिक्षा पाहिजे ना? घे हा पोचारा !

ज्यांच्या झोळीत पोचारा टाकला ते खरोखरच लक्षणाचे समर्थ होते. केवळ नावाचे समर्थ नव्हते. ज्या संतोषाने आनंदाने इतर भिक्षेमध्ये मिळालेल्या वस्तू त्यांनी घेतल्या त्याच संतोषाने समाधानाने आनंदाने त्यांनी पोचाराही घेतला.

अशी वृत्ती ज्या वेळेस आपली होईल त्याच वेळेस आपण जगाच्या हिताचे काही कार्य करू शकाल.

समर्थ्यांनी तो पोचारा घेतल्यानंतर नदी जवळ गेले. झोळीतून पोचारा काढला. त्याला चांगले धूतले. त्यातील शेण माती निघून गेली. बाकी राहिल्या त्या फाटलेल्या कापड्याच्या चिंध्या. त्या चिंध्या पासून समर्थांनी वाती बनविल्या व त्या वाती भगवंताच्या

मंदिरात लाऊन दिल्या. वातीपासून प्रकाश निघाला, त्या प्रकाशाने मंदिरातील अंधार नाहीसा झाला. त्याच प्रमाणे ज्या बाईने तो पोचारा दिला होता, तिच्या मनातील देखील अज्ञान अंधकार कमी झाला. तिला पश्चाताप झाला त्याच क्षणी म्हणजे संध्याकाळी ती बाई उठली व मंदिरात समर्थांकडे गेली व म्हणाली समर्थ मला क्षमा करा. माझ्या कडून फार मोठा अपराध झाला. आतापर्यंत शिव्या देण्याचा निंदा करण्याचा अपराध ती बाई करत आली होती, परंतु कधीही पश्चाताप झाला नव्हता, परंतु आज तिच्या पोचाऱ्यापासून बनविलेल्या वाती मंदिरात लागल्या व जे तिला पुण्य प्राप्त झाले त्या पुण्याने तिच्या मनात चांगल वाईट जाणन्याची सद्बुद्धी निर्माण झाली व पश्चातापाने जे बाकी पाप राहिले होते ते देखील नाश पावले व त्यामुळे तिची सद्गती झाली. तशी आपली सद्गती व्हावी असे वाटत असेल तर त्यासाठी आपण देखील दान केले पाहिजे .शेवटी गुरू नानकदेव देखील सावधान करतात...

**कहे नानक सून मेरे गुनिया । हुशार रहना अच्छा है ।**
**न माने तो खुशी है तेरी । हमको भी क्या परवा है ।।**

संत किंवा गुरु नानकदेव दान करण्याचा जो उपदेश करत आहे तो आपल्या हितासाठी आपल्या सद्गतीसाठी ते म्हणतात की आम्ही उपदेश केला मानने न मानने आपल्या हातात आहे. आपण जर मानाल तर आपले हीत होईल, कल्याण होईल व या जगात सुख समाधान मिळेल म्हणून दान करा. परंतु दान करण्याची संधी नेहमी मिळतेच असे नाही. आज आपल्याजवळ चांगलं तन, मन, धन असेल ते भविष्य काळात राहीलच असे नाही. आणि समजा राहिले तर सत्पात्र दानाची संधी भविष्यात मिळेलच असेही नाही.

जसी एक कथा येते की, एक भिकारी भिक मागून आता



आपल्या घराकडे निघाला होता त्याची झोळी धान्याने अगदी फाटायला आली होती. इतक्यात एका दिव्य रथामध्ये बसलेला देवदूत त्याने बघितला, त्याच्या मनात विचार आला की, हा देवदूत माझ्या रस्त्याने येईल का? आणि काय आश्चर्य तो देवदूत त्याच रस्त्याने आला. आता तो विचार करावयास लागला की देवदूत रथ थांबवेल किंवा नाही? आणि त्याच क्षणी देवदुताने रथ थांबविला. आता तो भिकारी विचार करावयास लागला की देवदूत रथात मी खाली रथावरती चढणे योग्य नाही. खाली या म्हणणेही योग्य नाही. मनात विचार आला की हे देवदूत खाली येतील का? आणि त्याच क्षणी तो देवदूत रथातून खाली उतरला. काय त्या भिकाऱ्याचे थोर भाग्य ! या रस्त्याने येईल की नाही तर आला. रथ थांबवेल किंवा नाही. थांबवला खाली येईल किंवा नाही खाली देखील आला. आता तो भिकारी मागण्यासाठी देवदूता समोर हात पसरणार तोच देवदूताने भिकाऱ्यासमोर हात पसरला.

झोळी धान्यांने फाटायला आली होती इतके धान्य झोळीत होते. देवदूताने हात पुढे केला म्हणून भिकाऱ्याने झोळीत हात घातला. बरेच दाणे हातात आले. भिकाऱ्याने बोट चाळवून एकच दाणा दोन बोटात धरून तो दाणा त्या देवदूताच्या हातावर ठेवला, तो एक दाणा त्या देवदूताने घेतला आणि काहीही न म्हणता जसा आला होता तसा निघून गेला.

भिकारी घरी आला त्याने झोळीतील धान्य टोपल्यात ओतले आणि काय आश्चर्य ! त्या दाण्यामध्ये एक सोन्याचा दाणा चमचम चमकत होता. हा एकच दाणा सोन्याचा कसा काय आला म्हणून तो विचार करायला लागला. तेव्हा त्याच्या लक्षात आले आपण त्या देवदूताला एक दाणा दिला म्हणून एक दाणा सोन्याचा झाला. जर

चांगले मूठभर किंवा त्यापेक्षा जास्त दाणे दिले असते तर मूठभर दाणे सोन्याचे झाले असते. परंतू आता पश्चाताप करून काय उपयोग? प्रत्येक दिवशी तो देवदूत परत परत थोडाच येणार आहे? म्हणून नानकदेवानी सांगितले की...

**कहे नानक सून मेरे गुनिया । हुशार रहना अच्छा है ।**

म्हणून हुशार राहिले पाहिजे, सावधान राहिले पाहिजे. कारण सत्पात्र दान करण्याची संधी जीवनात वारंवार मिळत नाही. बऱ्याच लोकांचा अनुभव आहे की, काही गावात, भागात अनुष्ठान होते त्या अनुष्ठानासाठी बरेच पुण्यात्मा तनाने, मनाने, धनाने सहयोग करतात. अनुष्ठान समाप्तीनंतर त्यांच्या जीवनात जे परिवर्तन घडते व त्यांना जो लाभ मिळतो तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, हा सर्व त्या दानाचा, पुण्याचा, सत्संग प्रवचनाचा परिणाम आहे. बरेच अभागी लोक नंतर पश्चाताप करतात की आपण देखील तणाने, मनाने, धनाने सहयोग देऊन लाभ घेतला असता तर बरे झाले असते. परंतु संधी जीवनातून निघून गेल्यानंतर केवळ पश्चाताप करत बसून काय लाभ? म्हणून ज्या वेळेस सत्पात्र दाणाची संधी मिळेल त्या वेळेस आपण त्या संधिचा उपयोग करून घेतला पाहिजे.

अशा प्रकारे सत्पात्री दान करा, असा कितीही उपदेश केला तरी सर्वच्या सर्व सत्पात्री दान करतीलच असे नाही. कारण नेहमीच्या अनुभवा वरून साधू संताना असे दिसून येते की पुण्यात्माना नाही सांगितले, नाही मागितले तरी दान केल्याशिवाय पुण्यात्मा राहत नाही. व पापी लोकांना कितीही उपदेश केला तरी ते सत्पात्री दान करत नाही. व चुकून त्यांनी दान केलेच तर ते सत्पात्री दान होऊ शकत नाही जसे एका मंदिरामध्ये एक डोळे बंद असलेला भिकारी गित म्हणत होता.

**तुम एक पैसा दोगे वह दस लाख देगा ।**



**तुम हमारी सुनेंगे वो तुम्हारी सुनेगा ।**

तुम्ही आमचे ऐका तो भगवंत तुमचे ऐकेल. तुम्ही मला एक पैसा दिला तर त्या दानाच्या बदल्यात भगवंत तुम्हाला दहा लाख रुपये देईल हे गीत एका लोभी शेठने ऐकले व त्याने विचार केला की हा धंदा चांगला वाटतो. आपण या भिकाऱ्याला एक पैसा दान केला तर आपणास दहा लाख रुपये मिळतील. म्हणून त्या शेठने शंभर रुपयाची नोट काढली व त्या भिकाऱ्याच्या हातावर ठेवली व आता मला शंभर रुपयाचे किती रुपये मिळतील याचे गणित तो करत बसला. त्या विचारात त्याला चांगली झोप देखील आली नाही दुसऱ्या दिवसी तो शेठ त्या भिकाऱ्याजवळून चालला होता, तेव्हा त्या शेठला मोठे आश्चर्य वाटले. कारण आज कालचा भिकारी चक्क डोळे उघडून पाहत असलेला त्या शेठने बघितला. एवढेच नव्हे तर तो भिकारी दुसऱ्या भिकाऱ्याला सांगत होता की, काल खूप मज्जा आली. मी डोळे लावून अंधळयाचे सोंग घेऊन गीत म्हणालो. तर एका शेठने शंभर रुपये दिले, मग दहा रुपयाची दारु पिलो वीस रुपयाचा मांसाहार केला. काही पैसे त्या वेश्येला दिले, असे बरेच काही तो बोलत होता. ते ऐकून शेठची तर अजूनच झोप उडाली. आता कसले दहा लाख आणि कसले वीस लाख. उलट शंभर रुपये देऊन पाप पदरात घेतले. कारण आपण दिलेल्या पैश्याने त्याने पापच पाप केले म्हणून तो शेठ एका संताकडे गेला आणि म्हणाला महाराज आपण दान करा असा उपदेश करता दान करून काय उपयोग? संत म्हणाले दान करून उपयोग कसा नाही दाणाने आपणास सद्‌गती मिळते. असे सांगितल्यानंतर शेठने घडलेला प्रसंग सांगितला तेव्हा संत म्हणाले शेठ पापाचा पैसा पाप्याकडे जातो व पुण्यवानाचा पैसा पुण्यकर्मासाठी खर्च होतो, असे ज्ञानी सांगतात. माझ्याकडे तर

खूप पैसे नाही फक्त एक रुपया आहे. ते गृहस्थ संत होते शिलाई काम करून जो पैसा त्यांना मिळत होता त्यातून देखील ते दान करायचे त्यांनी तो एक रुपया शेठजवळ दिला व सांगितले की शेठ गावात जा व वेशीत जो कोणी भेटेल त्याला हा एक रुपया दान द्या व तो काय करतो हे बघा. त्याप्रमाणे शेठने तो पैसा जे वेशीमध्ये एक ब्राह्मण भेटला त्यांना दिला. नंतर ते या पैशाचे काय करतात हे बघण्यासाठी त्यांच्या मागे शेठ गेले. तेव्हा त्या शेठला असे आढळले की ते अयाचक ब्राह्मण आहे. म्हणजे काहीही कोणाजवळ मागायचे नाही असा त्यांचा नियम होता न मागता एक रुपया मिळल्यानंतर त्या ब्राह्मणाने त्या एक रुपयाचे मुरमुरे, फुटाने घेतले व तीन दिवसांपासून जे ब्राह्मण कुंटुंब उपाशी होते त्यांनी ते मुरमुरे व फुटाने खाल्ले व पाणी पिऊन आनंदाने भगवंताच्या ध्यानात निमग्न झाले हा सर्व प्रसंग शेठने पाहिला व शेठ परत त्या संताकडे आले व घडलेला प्रसंग त्या संताला सांगितला तेव्हा ते संत म्हणाले. ''शेठ ! पुण्यवानाचा पैसा पुण्यवानाकडे व पाप्याचा पैसा पाप्याकडे जातो.'' म्हणून दान करण्याचा कितीही उपदेश केला तरी परंतु पापी दान करू शकत नाही व पुण्यात्मा दान केल्या शिवाय राहूच शकत नाही म्हणून आपण पुण्यात्मा असाल तर दान करा. परंतु दान मागू नका आणि दान मागायचेच असेल तर भगवंताकडे मागा कारण खरा दाता भगवंत आहे. त्या भगवंताकडे प्रार्थना करा, जसे संत प्रार्थना करतात.



**हेची दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।**

हे देवा हे परमेश्वरा आम्हाला हेच दान दे की तुझा विसर होऊ नये म्हणून प्रभू अशी कृपा कर.

**अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖

## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |